सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४६

# महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम, १९५६

(दिनांक ३० जून २००५ पर्यंत सुधारित)

## BOMBAY ACT No. XLVI OF 1956

# THE MAHARASHTRA CONTINGENCY FUND ACT, 1956

*(As modified upto the 30th June 2005)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर यांच्याद्वारे भारतात
मुद्रित आणि संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य,
मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२००६

[किंमत रुपये १.००]

# महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम, १९५६

अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे


१. संक्षिप्त नाव .. .. .. .. .. .. ..

२. महाराष्ट्र राज्याच्या आकस्मिकता निधीची स्थापना .. .. .. ..

३. आकस्मिकता निधीची अभिरक्षा आणि त्यातून रकमा काढणे .. .. ..

४. नियम करण्याचा अधिकार .. .. .. .. .. ..

५. निरसन .. .. .. .. .. .. ..

[सन १९५६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६][1]

# महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम, १९५६

[या अधिनियमास, दिनांक २४ नोव्हेंबर १९५६ रोजी राज्यपालांची अनुमती मिळाली ; ही अनुमती दिनांक २४ नोव्हेंबर १९५६ रोजी मुंबई शासन राजपत्र, भाग चार मध्ये प्रथम प्रसिद्ध करण्यात आली. ]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन व सुधारणा करण्यात आल्या आहेत :—

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०
सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०.
सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८* (३०-८-१९७५)†
सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०** (१७-४-१९७६)†
सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ (१४-२-१९७७)†
सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ (२१-५-१९७८)†
सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ (३१-३-१९७९)†
सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४*** (२६-११-१९७९)†
सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.
सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.
सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ (१-४-१९९०)†

**[2][महाराष्ट्र राज्यात] आकस्मिकता निधी स्थापन करणे व त्याचे परिरक्षण करणे यासाठी तरतूद करणारा अधिनियम.**

**ज्याअर्थी,** [2][महाराष्ट्र राज्यात] आकस्मिकता निधी स्थापन करणे व त्याचे परिरक्षण यासाठी तरतूद करणे इष्ट आहे ;

**आणि ज्याअर्थी,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २६७ च्या खंड (२) आणि अनुच्छेद २८३ चा खंड (२) अन्वये, राज्य विधान मंडळास, विधिद्वारे असा निधी स्थापन करण्याचा व त्याचे परिरक्षण करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आलेला आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सातव्या वर्षी याद्वारे, पुढील प्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. **१.** या अधिनियमास [3][महाराष्ट्र आकस्मिकता निधी अधिनियम, १९५६] असे म्हणता येईल.

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी मुंबई शासन राजपत्र, भाग ५, पृ. ३५२ पहा.

[2] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या अनुसूचीद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

*सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८, कलम ३ अन्वये सन १९७५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ निरसीत करण्यात आला.

†ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

**सन १९७६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४, हा सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम १ (३) द्वारे रद्द करण्यात आला, त्यामुळे त्यातील सुधारणा समाविष्ट केलेल्या नाहीत.

***सन १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १०, हा सन १९८० चा महाराष्ट्र अधिनयम क्रमांक ४, कलम १ (३) अन्वये रद्द करण्यात आला, त्यामुळे त्यातील सुधारणा समाविष्ट केलेल्या नाहीत.

[१][महाराष्ट्र राज्याच्या आकस्मिकता निधीची] स्थापना.

२. [१][महाराष्ट्र राज्याचा आंकस्मिकता निधी] या नावाच्या अग्रधनाच्या स्वरूपातील एक आकस्मिकता निधी स्थापन करण्यात येईल व त्यामध्ये, [२][महाराष्ट्र राज्याच्या] संचित निधीतून [३][रुपये एकशे पन्नास कोटी इतक्या रकमेचा] भरणा करण्यात येईल.

आकस्मिकता निधीची अभिरक्षा आणि त्यातून रकमा काढणे.

३. राज्यपालांच्या वतीने, सचिव, वित्त विभाग, [२][महाराष्ट्र शासन] हे राज्याचा आकस्मिकता निधी धारण करतील आणि विधीद्वारे करण्यात आलेल्या विनियोजनांअन्वये राज्य विधान मंडळ खर्च प्राधिकृत करीतोपर्यंत अकल्पित खर्च भागवण्याच्या प्रयोजनांव्यतिरिक्त इतर कारणांसाठी अशा निधीतून कोणतीही आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

४. या अधिनियमाची उद्दिष्टे पार पाडण्याच्या प्रयोजनांसाठी राज्य शासनास राज्याच्या आकस्मिकता निधीची अभिरक्षा, त्यात पैशाचा भरणा करणे आणि त्यातून पैसे काढणे याच्याशी संबंधित किंवा त्यास सहाय्यभूत अशा सर्व बाबींचे विनियमन करणारे नियम तयार करता येतील.

निरसन.

५. मुंबई आकस्मिकता निधी अधिनियम, १९५० आणि १ नोव्हेंबर, १९५६ या दिनांकानंतर, नवीन मुंबई राज्याचा घटक बनेल अशा कोणत्याही प्रदेशात, उक्त दिनांकाच्या लगतपूर्वी अंमलात असलेला, या अधिनियमाच्या तरतुदीनुरूप कोणताही निधी निरसित होईल. (१९५० चा मुंबई ५१.)

---

[१] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील आदेशान्वये मुंबई राज्याचा हा मजकूर फेरबदल न करता तसाच ठेवण्यात आला.

[३] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.